मराठी विभागामार्फत विद्यार्थिनी डॉ. सुप्रिया आवारे यांच्या काळोखाचा राजपुत्र या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ




प्रस्तावना करताना विभाग प्रमुख प्रा. डॉ.गोपाल गावडे



प्रकाशन समारंभ




लेखिका डॉ. सुप्रिया आवारे



विध्यार्थी व श्रोते



प्रकाशक मराठी विभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे



मराठी विभागास मॉरिशश येथील मराठी मंडळाने भेट दिली   दि. १३ एप्रिल २०२४






प्रस्तावनां करताना शिविम चे अध्यक्ष डॉ. भारत जाधव




मनोगत व्यक्त करताना अर्जुन पुतालाजी



सहभागी परदेशी विध्यार्थी



# ‘महावीर’मध्ये महानोरांना श्रद्धांजली

## आयोजित कविसंमेलनात जागविल्या कविवर्यांच्या आठवणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा आणि महावीर महाविद्यालयामार्फत कविवर्य ना. धों. महानोर यांना शनिवारी श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शिक्षक, विद्यार्थ्यांनी दोन मिनिटाचे मौन पाळले.

बी.ए.बी.एड. विभागाच्या विद्यार्थ्यांनी ना. धों. महानोर यांच्या कवितांचे वाचन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे होते. यावेळी बी.ए.बी.एड. विभागाचे समन्वय डॉ. महादेव शिंदे आणि प्रा. जयवंत दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. महानोर यांच्या श्रद्धांजलीनिमित्त आयोजित कवी संमेलनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून कवयित्री लता ऐवळे-कदम उपस्थित होत्या. त्यांनी महानोरांच्या आठवणी जागवल्या. त्यांनी सुरेल आवाजात ना. धों. च्या आषाढातली पानकळा, घन ओथंबून येती, मोडलेल्या माणसाचे दुःख, नारायण सुर्वे यांच्या कविता तसेच बाप नावाची स्वतःची कविता गाऊन दाखवली. यावेळी स्नेहा आवटे, विपुल कांबळे, धनश्री कांबळे, जय बाचनकर, अरुणा पाटील यांनीही महानोरांच्या कविता वाचून दाखविल्या. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये बदलण्याची प्रक्रिया सुरू होते असे सांगितले.

यावेळी द.म.सा.चे कार्यवाह डॉ. विनोद कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांनी प्रास्तविक केले. वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष सुशांत चौगुले यांनी परिचय करून दिला. विपुल कांबळे यांनी आभार मानले. जय बाचनकर, शरयू चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. शैलजा मंडले, डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ. अंकुश बनसोडे, डॉ. सरिता मोरे, स्नेहल तावडे, ऋतुजा पारदे उपस्थित होते.

# अनुवादित साहित्याने मराठी भाषा समृद्ध केली

## पी. डी. देशपांडे; मराठी राजभाषा गौरव दिन कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केवळ त्याच भाषेतील साहित्यिकांनी लिहिलेल्या साहित्यामुळे एखादी भाषा समृद्ध होते हा विचार आता मागे पडला आहे. अनुवादित साहित्यामुळे भाषा व आशय समृद्धीला अधिक बळकटी येत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अनुवादक पी. डी. देशपांडे यांनी केले.

महावीर महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका डॉ. सुषमा रोटे होत्या. अनुवादक देशपांडे यांनी हिंदी साहित्यातील नामवंत कवी सुनया कचरू, दुष्यंत कुमार, सविता भार्गव, चंद्रकांत देवताले, नरेश सक्सेना व अमृता प्रितम यांच्या कवितांचे सादरीकरण करून त्यांचा मराठी अनुवाद सादर केला.

प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश कांबळे यांनी प्रास्ताविक केले, प्रा. रविदास पाडवी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. मराठी विभाग प्रमुख डॉ. गोपाळ गावडे यांनी मराठी राजभाषा गौरव दिनाचे महत्त्व विषद केले. डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. श्रध्दा पाटील, डॉ. सुषमा चौगुले यांनी केले. यावेळी निलांबरी कुलकर्णी, गौरी भोगले, प्रभा कामत, राजश्री साखळे, नरहरी कुलकर्णी, मनोहर देशभ्रतार, रेखा देसाई, अभय जोशी, सुरेश चौगुले, सुप्रिया आवारे व डॉ. महादेव शिंदे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयामध्ये अनुवादित कवितांचे सादरीकरण करताना पी. डी. देशपांडे. सोबत मान्यवर.**

